MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

त्रैमासिक

# सामाजिक अनुसंधान

वर्ष १ले • अंक १ला • सप्टें - डिसें-२०१३ • मूल्य १००रु.

• संपादक •
कैलास गणपतराव कानिंदे

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

त्रैमासिक
# सामाजिक अनुसंधान

वर्ष 1 ले | अंक 1 ला | सप्टें-डिसें-2013

● संपादक : कैलास कानिंदे ●

● कार्यकारी संपादक ●
डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

● सहसंपादक ●

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.संदिप गोरे (बसमत)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

● संपादक मंडळ ●

प्रा.देवेंद्र नवसे (ठाणे)
प्रा.नामदेव डोंगरे (चिपळूण)
प्रा.भरत राठोड (पुणे)
प्रा.बालाजी विजापुरे (भोकर)
प्रा.शिंवाजी बल्लुरे (नांदेड)
प्रा.जी.एच.आडेराघो (नांदेड)
प्रा. श्रीनिवास पिलगुलवार (वरोरा)
प्रा. गणेश नरकुलवाड (पुणे)
प्रा. प्रकाश इंगळे (पुणे)
प्रा.संग्राम शिंदे (ठाणे)
धम्मपाल जाधव (भोकर)

● सल्लागार मंडळ ●

डॉ.के.सी. शेंडे
समाजशास्त्र विभाग प्रमुख, पीपल्स कॉलेज, नांदेड.
डॉ. डी.एच. किर्दक
चेअरमन, बोर्ड ऑफ स्टडी, समाजशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती
डॉ. संजय दुधे
चेअरमन, बोर्ड ऑफ स्टडी, समाजशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर.
डॉ.ए.डी.चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमुख, विद्याभारती महाविद्यालय,अमरावती.
प्रा.जे.टी. जाधव
मराठी विभाग, डी.बी.कॉलेज,भोकर,जि.नांदेड.
डॉ. बी.एन.गायकवाड
इंग्रजी विभाग प्रमुख,एन.जी.आचार्य आणि डी.के. .मराठे कॉलेज, चेंबूर (ई.) मुंबई
डॉ. राजेंद्र गोणारकर
माध्यमशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
डॉ. आदिनाथ इंगोले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गुरु बुध्दी स्वामी महाविद्यालय

पत्रव्यवहारासाठी पत्ता :-
त्रैमासिक
सामाजिक अनुसंधान कार्यालय,
''मुक्ताई निवास'' वनक्षेत्र कार्यालयाजवळ,
समतानगर, भोकर ता.भोकर जि.नांदेड.-431801
E-mail- Samajikanusandhan@gmail.com
Mob.No.9767044993
वार्षिक वर्गणी - 400 रु.
अंकाचे मूल्य -100 रु.

शोध निबंध पाठविण्यासंबंधी माहिती
1. शोध निबंध ई-मेल ने पाठवावा.
2. शोध निबंधाची सी.डी. व प्रिंट कॉपी फक्त पोस्टाने पाठवावी.
3. शोध निबंध हा MS-WORD-2007 मध्ये ISM-DVBTT-SUREKH Font Size-14 मध्ये टाईप केलेला असावा.
4.संदर्भसूची लेखकाचे नांव, ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष व पृ.क्र. असणे आवश्यक
5. शोध निबंधासोबत स्वतःचा असल्याचे पत्र स्वतःच्या सहीने पाठवावे.

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.
टिप :- कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

# मानवी अधिकारांची संकल्पना

प्रा. पंडित आर.बी.
श्री.शिवछत्रपती महाविद्यालय,
जुन्नर, जि. पुणे.

**प्रस्तावना :**

मानवी अधिकाराची संकल्पना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची आहे. मानव जातीला स्वत:चा विकास करण्याची जोपर्यंत राजकीय व्यवस्थेअंतर्गत पुरेसे वातावरण तयार होत नाही. तोपर्यंत मानवी हक्काची जोपासना योग्य रितीने होणार नाही. खरे तर जन्मत:च मानवाला मानवी अधिकाराची प्राप्ती झाली आहे. सामाजिक व राजकीय व्यवस्थेअंतर्गत समता, स्वातंत्र्य, बंधुता ही मूल्ये जोपासण्याचे कामकाज मानवी अधिकार करीत असतात.

सध्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात मानवांच्या संरक्षणाची जाणीव एकीकडे होताना दुसरीकडे मानव अधिकाराचे उल्लंघनही मोठ्या प्रमाणात होताना दिसते. प्रत्येक व्यकतीचा विकास साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेने मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहिरनामा स्विकारला. दडपशाही व , सापत्नभाव यांच्या विरोधात संरक्षण करणे हा यामागील उद्देश होता. या अधिकारात पहिल्यांदाच व्यक्तिगत स्वातंत्र्य व हक्काविषयी माहिती नोंदवविली आहे. मानवी हक्काची संकल्पना जरी द्वितीय महायुध्दानंतरची असली तरी मानवी हक्कासंबंधी विचार फार पूर्वीपासून केला जात आहे. उदा. १२१५ मधील मॅग्नाकार्टा करार, १६७८ मधील बंदी प्रत्यक्षीकरण, १८८९ मधील बील ऑफ राईट्स, १७७६ अमेरिकन स्वातंत्र्याची घोषणा, १७८९ फ्रान्सने मानवी हक्कास दिलेली मान्यता इत्यादी घटना क्रमातून मानवी हक्क जोपासण्याचे प्रयत्न झाले आहेत. परंतु या हक्कास आंतरराष्ट्रीय स्वरुप व मान्यता संयुक्त राष्ट्रामार्फत १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी सनद स्विकारुन देण्यात आली.

**मानवी अधिकाराचा अर्थ :**

नानवी हक्क किंवा अधिकार माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी उपयुक्त असतात. मानवी हक्क म्हणजे मानव म्हणून जगण्याचे अनिवार्य शिष्टाचार आहे. यामध्ये असे अपेक्षित आहे की, मानव हा जन्मत: मुक्त आणि समान असतो. त्याला भेदभवाची वागणूक न देता समानतेची वागणूक दिली पाहिजे.

**मानवी अधिकारांच्या व्याख्या :**

**१) रॅन्डम हाऊस विश्वकोष :**

मानवी अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त असलेले असे अधिकार की, जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**२) मॅरिस क्रॅंटसन :**

मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्याचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.

**३) डर्वानिन :**

मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्याचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.

**मानवी अधिकारांची संकल्पना :**

व्यक्ती हा सामाजिक व राजकीय प्राणी असल्याने स्वत:चा विकास साध्य करण्यासाठी त्याला काही हक्क असतात. सर्व मानव समान आहेत व त्यांना काही मुलभूत गरजा असतात. त्या व्यक्तीला प्रतिष्ठापूर्वक व सन्मानपूर्वक पूर्ण करता आल्या पाहिजेत. ह्या तत्वावरच मानवी अधिकाराची संकल्पना उभारलेली आहे. मानवी अधिकाराचे स्वरुप वैश्वीक व व्यापक स्तरावरचे आहे. सामाजिक व राजकीय जीवन जगताना व्यक्ती-व्यक्तीत भाषा, धर्म, जात, वंश, लिंग, राष्ट्रीयता यामध्ये भेदभाव न करता समानतेच्या वागणूकीतून प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याची पुरेशी संधी उपलब्ध झाली पाहिजे. त्यावर राज्यांमार्फत कसलीच बंधने येता कामा नये. सदरील अधिकार योग्य प्रमाणात व्यक्तींना उपभोगता आले पाहिजेत. अशी अनुकूल परिस्थिती राज्यांनी निर्माण करणे गरजेचे आहे. मानव हा बुध्दीवादी प्राणी असल्याने त्यांच्यात वैचारिक शक्ती आहे. चांगले वाईट याची जाण व्यक्तीला असते. आपल्या निर्णय क्षमतेनुसार मानवी हक्काद्वारे ते आपला विकास करु शकतात. मानव अधिकारावर इतर अधिकारांच्या मर्यादा नसतात. ते स्थळ, काळानुसार बदलत नाहीत. तसेच सामुहिक हितसाठी देखील या हक्काचे उल्लंघन करता येत नाही.

मानव अधिकार हे नैसर्गिक अधिकाराचे आधुनिक व धर्मनिरपेक्ष रुप असल्याने व्यक्तीला

TRUE COPY

इतर व्यक्तीपासून, राज्याच्या अमर्याद सत्तेपासून, हिंसाचारापासून संरक्षणाचे कवच आहे. तसेच या हक्काची निर्मिती स्वाभाविक असल्याने राज्य त्यांना केवळ औपचारीक मान्यता देत असते. हे अधिकार व्यक्तीला राज्याविरुध्द प्राप्त झालेले असल्याने प्रत्येक राज्याने या अधिकाराचा आदर करायला पाहिजे. मानव हा सामाजिक प्राणी असल्याने सामाजिक वास्तव्य, कुटुंबाचा विकास व आपली अंतिम ध्येय पूर्ण करण्यासाठी मानवी अधिकाराची गरज अत्यावश्यक ठरते. यारितीने मानव समूहाच्या मूलभूत गरजातून मानव अधिकाराची निर्मीती होऊन त्याचे वैश्वीक हक्कामध्ये रुपांतर होते.

**मानव अधिकाराच्या सार्वत्रिक जाहिरनाच्याचा मसुदा :**

जानेवारी १९४७ मध्ये मानवी अधिकारांवरील आंतरराष्ट्रीय कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी मानव अधिकार आयोगाची पहिली बैठक झाली व सर्वसाधारण सभेने १९४८ मध्ये सार्वत्रिक जाहिरनाम्याला मान्यता दिली. मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्यासाठी सार्वत्रिक आदराचे महत्त्व केंद्रस्थानी ठेऊन आठ सदस्यीय समितीने सार्वत्रीक जाहिरनाम्याचा प्राथमिक मसुदा तयार केला. वरील महत्त्वपुर्ण मुद्यावरोबरच असापेक्षता. नागरी व राजकीय हक्क, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक हक्क या तत्त्वाचाही समावेश केला. आंतरराष्ट्रीय सहकार्य व मतैक्य मिळविण्यासाठी राज्याच्या माध्यमातून सदरील मसुदा सर्वसाधारण सभेत तो मांडण्यापूर्वी त्यांचे परिक्षण करुन त्यात सुधारणा केल्या. सदस्य सर्वसाधारण सभेत सदरील मसुद्यावर ५८ सदस्य राष्ट्रांनी एकूण १४०० वेळेस आपली मते दिली. त्यात अनेक वेळा वादविवाद झाले व शेवटी संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण सभेने १० डिसेंबर १९४८ रोजी एकमताने मंजुरी दिली. म्हणुन दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस जगभरात मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

मानवी अधिकारांच्या सार्वत्रिक जाहिरनाम्यात ३० कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत.

**सारांशाने पुढीलप्रमाणे सांगता येतील -**

**कलम १** -प्रतिष्ठेचे स्वातंत्र्य आणि समानतेचा हक्क

**कलम २** -सापेक्षतेपासून मुक्ती

**कलम५**-छळवणुक किंवा मानहानिकारक वागणूकी पासून स्वातंत्र्य

**कलम ६** -कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून अधिकृत मान्यतेचा हक्क

**कलम ७** -कायद्यासमोर एकसमान योग्यतेचा हक्क

**कलम ८** -कार्यक्षम न्याय सभेमार्फत उपाय मिळविण्याचा हक्क

**कलम ९** -जुलमी कैद किंवा हद्दपारीपासून स्वातंत्र्य

**कलम १०** -न्याय सुनावणी किंवा सार्वजनिक सुनावणीचा हक्क

**कलम ११** -दोषी सिध्द होईपर्यंत निरपराध मानले जाण्याचा हक्क

**कलम १२** -एकांतात ढवळाढवळ करण्यापासून स्वातंत्र्य, यात घर, कुटुंब व पत्रव्यवहार यांचा समावेश आहे.

**कलम १३** -हालचालींच्या स्वातंत्र्याचा हक्क आणि स्वत:च्या देशात घर असण्याचा आणि हवे तेंव्हा येण्या जाण्याचा हक्क.

**कलम १४** -सुरक्षित आश्रय स्थानाचा हक्क

**कलम १५** -राष्ट्रीयत्वाचा हक्क आणि ते बदलण्याचे स्वातंत्र्य

**कलम १६** -विवाह व कुटुंबाच्या संरक्षणाचा हक्क

**कलम १७** -मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क

**कलम १८** -श्रध्दा आणि धर्मासंबंधी स्वातंत्र्य

**कलम १९** -अभिप्राय आणि माहितीचे स्वातंत्र्य

**कलम २०** -शांततापूर्ण सभा आणि संगतीचा हक्क

**कलम २१** -मुक्त मतदानात सहभागी होण्याचा हक्क आणि सार्वजनिक सेवेला समान सवलती

**कलम २२** -सामाजिक सुरक्षिततेचा हक्क

**कलम २३** -काम करण्याचा व न्याय वेतन मिळण्याचा हक्क

**कलम २४** -विश्रांती आणि फुरसतीचा हक्क

**कलम २५** -आरोग्य व राहणीमानाचा हक्क

**कलम २६** -शिक्षण प्राप्तीचा हक्क

**कलम २७** -सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क

**कलम २८** -मानवी हक्काची हमी देणाऱ्या सामाजिक सुव्यवस्थेचा हक्क

**कलम २९** -व्यक्तीच्या संपूर्ण व स्वतंत्र व्यक्तीगत विकासासाठी

**कलम ३०** -[illegible]

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्वसाधारण सभेने मानवी हक्काच्या सार्वत्रिक जाहिरनाम्यात मंजुरी दिल्यानंतर सदरील जाहिरनाम्याच्या तत्वांचे आंतरराष्ट्रीय करारामध्ये रुपांतर करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये नागरी आणि राजकीय हक्क तसेच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक- हक्क यावरील आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासभेने मंजुर केला. यात नमुद केलेल्या हक्कांची कायद्याद्वारे अंमलबजावणी करणे बंधनकारक असते. ३ जानेवारी १९७६, रोजी नागरी व राजकीय हक्काच्या आंतरराष्ट्रीय सनदेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली. तसेच २३ मार्च १९७६ रोजी आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्काची आंतरराष्ट्रीय सनदेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली.

**निष्कर्ष :**

मानवी अधिकाराची संकल्पना अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, आज प्रत्येक व्यक्तींना योग्य जीवन जगण्यासाठी या हक्कांची अत्यंत गरज असते. एकीकडे मानवास हे हक्क राज्यामार्फत योग्यरित्या पुरविले पाहिजेत असे मत असताना अनेकदा राज्यामार्फत या हक्काचे उल्लंघन ही होताना दिसते.' आजची परिस्थिती पाहता असे दिसून येते की, मानवी हक्क ही संकल्पना फक्त नावापुरती त्या-त्या राज्यांनी स्विकारली आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात आजही मानवी हक्कांची अंमलबजावणी योग्य प्रमाणात होताना दिसत नाही. भारतीय राज्यघटनेत आपणास मूलभूत हक्काचा वापर करताना सुध्दा त्यावर अनेकवेळा बंधने येतात. मानवी हक्क जरी जन्मतःच आपणास प्राप्त होत असले तरी भारतासारख्या विविधता प्राय राष्ट्रात स्त्रियांना, दलितांना हे मानवी हक्क प्राप्त होताना दिसत नाहीत. खरच जर आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व मानव समूह सुखी करायचा असेल तर प्रत्येक राष्ट्राने सकारात्मक भूमिकेतून मानवी जनतेप्रती पोहचविणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**

१) डॉ.राजेंद्र देवळाणकर -समकालीन जागतिक राजकारण.

२) प्रा. जॉन्सन बोर्जेस संपादित संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना डायमंड पब्लीकेशन - २०११

३) डॉ. ज.रा.शिंदे डॉ. प्रशांत अमृतकर, समकालीन राजकारणातील प्रमुख प्रश्न.

४) प्रा.सुधाकर जोशी, आंतरराष्ट्रीय सबंध.

५) नंदकुमार भारंबे, मानवी हक्क व समाज निराली प्रकाशन

६) तुकाराम जाधव, युनिक बुलेटिन

७) नंदकिशोर आचार्य - मानव अधिकार की संस्कृती, वाग्देवी प्रकाशन, बिकानेर.

TRUE COPY
Offg. Principal
S. S. C College Junnar (Pune)